# गांधीहत्या आणि मी

**लेखक**
**गोपाळ गोडसे**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**गांधीहत्या आणि मी : गोपाळ गोडसे**

© **हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत (कै.) श्री. ग. वा. बेहेरे यांनी अस्मिता प्रकाशनाच्या माध्यमातून सर्वप्रथम हे पुस्तक प्रकाशित करण्याचे साहस दाखवले. त्यांचे पश्चात त्यांचे सुपुत्र श्री. रवी बेहेरे यांनी रविराज प्रकाशनाच्या माध्यमातून या पुस्तकाच्या आवृत्ती काढल्या. गोडसे कुटुंबीय ग. वा. बेहेरे व रवी बेहेरे यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

**– हिमानी सावरकर**

---

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्

२५०, ब–३०, शीतल बंगला,

नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**

रावजी देसाई

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**

श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**

अस्मिता व रविराज प्रकाशन, पुणे यांच्या एकूण १८ आवृत्त्या प्रकाशित (३५,५०० प्रती)

**रिया प्रकाशन, कोल्हापूर.** प्रथम आवृत्ती सप्टेंबर, २०१२ (१२,००० प्रती)

**किंमत**

जनआवृत्ती रुपये १००/–

# गांधीहत्या आणि मी

गांधीहत्या आणि मी
गांधीहत्या आणि मी

# *पहिले पान*

दिनांक ५ फेब्रुवारी १९४८ ला मी पुणे-मुंबई मार्गावरील कामशेत स्थानकापासून दहा मैलावर असलेल्या उकसाण या माझ्या गावी गेलो होतो. मुंबई आरक्षी दलाचे (Police Force) एक पथक तेथे त्या दिवशीच येऊन पोहोचले. मला त्या पथकाने अटक केली आणि मुंबईस नेले. माझा गांधीहत्येशी संबंध आहे, अशा आरोपावरून ही अटक झाली होती.

दिल्लीच्या लाल किल्ल्यातील विशेष न्यायालयात हा खटला चालला. आरोप सिद्ध करण्याचे दायित्व आरोप ठेवणाऱ्यावर असते. आरोपी मूक राहील किंवा आरोप नाकारतील. माझा गांधीहत्येशी कसलाच संबंध नाही हे माझे प्रतिपादन होते. अर्थात, शपथेवर नव्हे. अभियोजकांनी (Prosecutors) आरोप सिद्ध केला. मला दिनांक १०-१-१९४९ ला जन्मठेपेची शिक्षा झाली. दिनांक १३-१०-१९६४ ला मी शिक्षेतून मुक्त झालो.

गांधीजींचा शस्त्राचाराने अंत ही घटना हिंदुस्थानच्या अलीकडील इतिहासाचे एक पान आहे. गांधीजींच्या चरित्राचे ते अंतिम प्रकरण आहे. ते प्रकरण विकृत करून लिहिले गेले, तर त्यांचे चरित्र इतिहास या संज्ञेला पात्र राहणार नाही. ते प्रकरण गाळले, तर गांधीजींचे चरित्र अपुरेच राहील.

न्यायासनाला योग्य ते मोल द्यावयाचे असेल, तर माझा या हत्येशी संबंध होता हे मानणे क्रमप्राप्त आहे. मी जरी आरोप नाकारला असला तरी आवश्यक तेवढ्या पुराव्यानिशी तो आरोप माझ्या पदरात टाकला गेला आणि म्हणून मला शिक्षा झाली हे सत्य आहे.

न्यायालयात खटल्याशी संबंधित किंवा वादग्रस्त व्यक्तीशी, वस्तूशी वा आरोपीशी संबंधित अशा सर्वच घटना पुढे येतात असे नाही. काही गोष्टी पुढे आणणे आरोप सिद्ध होण्याच्या दृष्टीने हितावह नाही, या दृष्टीने अभियोजक पक्ष वगळतो.


याउलट काही गोष्टी पुढे आणल्या, तर त्या आपल्या बचावाला हानिकारक होतील अशी आरोपीची धारणा असते, म्हणून ते त्या गोष्टी वगळतात. आज त्या हत्येशी संबंधित आणि जन्मठेप शिक्षा झालेले सर्व अभियुक्त मुक्त झालेले आहेत. मी त्यातला एक आहे. या घटनेकडे – एका अप्रिय प्रकरणाकडे – इतिहास या दृष्टीने पाहण्याची इच्छा असेल अशा वाचकांसाठी या प्रकरणाशी संबद्ध घटना वस्तुनिष्ठ भूमिकेतून लिहिण्याचा माझा मानस आहे. लेखमालेतील अधली-मधली प्रकरणे जशी सिद्ध होतील तशी विनाविलंब वाचकांना द्यावी, अशी माझी इच्छा आहे.

या 'अंतिम पर्वात' हत्येच्या परिणामांचा वृत्तान्तही समाविष्ट आहे, कारण गांधीजींच्या अंतिम कालखंडाशी त्याचे धागेदोरे निगडित आहेत.

आज गांधीजी जिवंत नाहीत. नथुराम जिवंत नाही. नाना आपटे जिवंत नाहीत. उरलेले तीन दंडित आपापले प्रायश्चित्त भोगल्यानंतर मुक्त केले गेले आहेत. 'मरणान्तानि वैराणि' या आपल्या विचारसरणीप्रमाणे गांधीजींशी ते जिवंत असताना, कधी कोणाचा द्वेष असलाच, तर आज त्यांच्या स्मृतीशी कटू भावना वागविल्या जाणे योग्य होणार नाही. बंदिगृहातील गांधी जयंतीच्या मेळाव्यात मी सहभागी होत असे. पुष्कळदा अशा मेळाव्यांची योजनाही मी करीत असे. आज हे सांगताना मला कोणताही संकोच वाटत नाही. आपण तत्त्वभ्रष्ट झालो असे वाटत नाही किंवा बंदिगृहाचा दबाव असल्याने आपण त्या त्या प्रसंगी सहभागी झालो असेही मला वाटत नाही. तसेच हत्येशी संबंधित व्यक्तीशी किंवा दिवंगतांच्या स्मृतीशी कटू भावना वागविल्या जाणेही योग्य होणार नाही. इतिहास याच दृष्टीने या प्रश्नाकडे बघितले जावे, अशी माझी विनंती मानणे न मानणे मी वाचकांवर सोडीत आहे.

दिनांक : २७-३-६६ **– गोपाळ विनायक गोडसे**

## अखंड हिंदुस्थानचे मानचित्र
## सिंधू नदी



चित्रे : डावीकडे : नारायण आपटे, उत्सर्ग १५.११.४९

उजवीकडे : स्वातंत्र्यवीर सावरकर, आत्मार्पण दिवस २६.२.६६

मानचित्रात : नथुराम गोडसे, उत्सर्ग १५.११.४९

प्रतिवर्षी १५ नोव्हेंबरला इच्छापत्र पुनरुच्चार समारोहपूर्वक केला जातो. सिंधू नदी स्वतंत्र हिंदुस्थानच्या छत्रछायेत स्वच्छंदतेने वाहू लागली म्हणजे अस्थींचे विसर्जन त्या नदीत कर ! तोवर अस्थींचे भावी पिढ्यांना हस्तांतरण करीत रहा.

समारोहात उभे करण्यात येणारे प्रमुख दृष्य

## आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८





नथूराम गोडसे : उत्सर्ग १५.११.४९




नारायण आपटे : उत्सर्ग १५.११.४९

## आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८



विष्णु करकरे : (दिवंगत दि. ६.४.१९७३)





मदनलाल पाहवा : मुक्तता १३.१०.६४

## आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८




स्वातंत्र्यवीर सावरकर : निर्दोष मुक्तता




गोपाळ गोडसे : मुक्तता ३०.११.६५